प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती कार्यालयातील मोटार वाहन क्र. MH०२EU-६४९८ या वाहनासोबत घडलेल्या अपघातप्रकरणी भा.द.वि. अपराध क्र.२९७, ३३७ व ३३८ प्रमाणे दाखल गुन्ह्याबाबत नुकसान भरपाईची रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
परिवहन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०४२६/प्र.क्र.२६६/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पआका /का.८ अ (४) /ब.गोंडाळे /कंवाचा /अपघात /कादानो/नस्ती क्र.७५/२०२६/जा.क्र.८७९३, दि.०४.०८.२०२६.

शासन निर्णय :-

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती या कार्यालयातील मोटार वाहन क्र.MH०२EU-६४९८ या वाहनासोबत घडलेल्या अपघातप्रकरणी भा.द.वि. अपराध क्र.२९७, ३३७ व ३३८ प्रमाणे दाखल गुन्ह्याबाबत नुकसान भरपाईची रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा करण्यासाठी रु.१,६५,१२०/- (अक्षरी रुपये एक लाख पासष्ट हजार एकशे वीस फक्त) इतकी रक्कम मा. न्यायालयात जमा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी अदा करण्यासाठी मंजूर केलेल्या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींवर खर्च होणार नाही याबाबतची दक्षता प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांची राहील.

३. या बाबीवर होणारा खर्च " मागणी क्र. बी-३, २०४१, वाहनांवरील कर, (२) प्रादेशिक कार्यालये (२) (१) प्रादेशिक कार्यालये (अनिवार्य), (२०४१००३६), १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.३६४/२०२६/व्यय-८ दि.१७.०८.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२११६५४२४४५३९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.08.21 16:55:36 +05'30'

(चेतन निकम)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६) प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती

७) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

८) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) निवडनस्ती (परिवहन-४).